# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** **मॉडर्न कम्युनिकेशन चॅनलच्या व्यवस्थापनाकरीता एजन्सी नियुक्ती**
**{जनसंपर्क विभाग }** **करण्यासाठी निविदा बोलविण्याबाबत.**

नागपूर महानगरपालिका माडर्न कम्युनिकेशन व्यवस्थापन करण्यासाठी एजेंसी नियुक्ती करणे आवश्यक आहे. जनसंपर्क विभागात सोशल मीडीया तसेच विकास कामे/ बैठक/सभा संबंधी कार्याची बातमी तयार करण्यासाठी तज्ञ अधिकारी /कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे एजन्सची मदत होत आहे. सध्या कार्यरत एजेंसी तर्फे ४ कर्मचारी कार्यरत आहे. कामाचा व्याप लक्षात घेता ६ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

सध्या कार्यरत मेसर्स आय.टी क्राफ्ट टेक्नॉलाजीस प्रा.लि. यांची कालावधी ३१ जुलै २०२३ रोजी संपुष्टात आली असल्याने पुढील दोन वर्षा करीता एजेंसी नियुक्त करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे वार्षिक खर्च रु ३० लक्ष च्या खर्चाला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

तसेच दरम्यानचे काळात मनपाची कामे खोळंबु नये म्हणुन निविदा प्रक्रिया पुर्ण करुन नवीन एजन्सीला कार्यादेश देई पर्यंत जुन्याच अटी व शर्तीवर विद्यमान एजेंसीला मुदतवाढ मंजुर करणे.

टिप :- प्रस्तुत खर्चासाठी जनसंपर्क विभागाचे (साप्रवि) पद क्रं. A200100120308 मध्ये तरतुद करण्यात आली असुन सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 540/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 28/09/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा.आयुक्त (साप्रवि), जनसंपर्क विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार **मॉडर्न कम्युनिकेशन चॅनलच्या व्यवस्थापनाकरीता एजन्सी नियुक्त करण्यासाठी निविदा बोलविण्याबाबत**.

नागपूर महानगरपालिका माडर्न कम्युनिकेशन व्यवस्थापन करण्यासाठी एजेंसी नियुक्ती करणे आवश्यक आहे. जनसंपर्क विभागात सोशल मीडीया तसेच विकास कामे/ बैठक/सभा संबंधी कार्याची बातमी तयार करण्यासाठी तज्ञ अधिकारी /कर्मचाऱ्यांची कमतरता असल्यामुळे एजन्सची मदत होत आहे. सध्या कार्यरत एजेंसी तर्फे ४ कर्मचारी कार्यरत आहे. कामाचा व्याप लक्षात घेता ६ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे.

सध्या कार्यरत मेसर्स आय.टी क्राफ्ट टेक्नॉलाजीस प्रा.लि. यांची कालावधी ३१ जुलै २०२३ रोजी संपुष्टात आली असल्याने पुढील दोन वर्षा करीता एजेंसी नियुक्त करण्यासाठी नव्याने निविदा प्रक्रिया करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे वार्षिक खर्च रु ३० लक्ष च्या खर्चाला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेऊन,

तसेच दरम्यानचे काळात मनपाची कामे खोळंबु नये म्हणुन निविदा प्रक्रिया पुर्ण करुन नवीन एजन्सीला कार्यादेश देई पर्यंत जुन्याच अटी व शर्तीवर विद्यमान एजेंसीला मुदतवाढ मंजुर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**